पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - मित्रत्व ही आयुष्याची सर्वात सुंदर भेट आहे. एक खरा मित्र आपल्या सुख-दुःखात साथ देतो.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७५,५२७.९५ +१६९५.४० +२.३०%
डॉलर ₹ ९५.११

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | २७ |
| दिल्ली | ३६ | २७ |
| मुंबई | ३६ | ३० |
| नागपूर | ३९ | २७ |
| पुणे | ३५ | २६ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १४ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २१३ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:१०

सोने – चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,४७,८५०/- | २,४०,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

## थोडक्यात



### एलन मस्क ठरले जगातील पहिले खरबपती

**वाशिंग्टन ।** उद्योगपती एलन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीच्या बहुचर्चित आयपीओला अमेरिकन शेअर बाजारात दमदार प्रतिसाद मिळाला असून, या लिस्टिंगमुळे मस्क यांनी इतिहासातील पहिले ङ्गखरबपतीफ (ट्रिलियन डॉलर संपत्ती असलेले) व्यक्ती म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. फोर्ब्सच्या रिअल-टाइम आकडेवारीनुसार, त्यांची एकूण संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलर (सुमारे ९४.६ लाख कोटी रुपये) इतकी झाली आहे. १२ जून रोजी नॅस्डॅकवर स्पेसएक्सचे समभाग १३५ डॉलरच्या इश्यू किमतीच्या तुलनेत ११ टक्के वाढीसह १५० डॉलरवर सूचीबद्ध झाले. या यशस्वी लिस्टिंगनंतर कंपनीचे बाजारमूल्य सुमारे १.९६ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले असून, ती अमेरिकेतील सहाव्या क्रमांकाची सर्वात मोठी सूचीबद्ध कंपनी ठरली आहे.

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आता माघार नाही–रोहित पवार

**मुंबई ।** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कालपासून पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन सुरु केलंय. रोहित पवारांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. दरम्यान, आम्हीही जिद्दी आहोत. जोपर्यंत कर्जमाफीमधील जाचकाठी निघत नाही आणि त्याचा फायदा सर्व शेतकऱ्यांना मिळत नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन मागे घेणार नाही, असा इशारा रोहित पवार यांनी दिलाय. त्यासोबतच अतिरिक्त पोलीस अधीक्षकांच्या पुढाकाराने रोहित पवार यांची कृषिमंत्री आणि सहकार मंत्र्यांशी सविस्तर चर्चा झालीय. राज्याच्या कॅबिनेट मंत्र्यांनी २०१९ च्या कर्जमाफीची जाचक अट मागे घेण्याबाबत रोहित पवारांनी भूमिका घेतली.

# ‘त्या’ दिवशी ‘ऑपरेशन टायगर’ फत्ते होणार

## उद्धव ठाकरेंना मोठा झटका बसणार?; कोणते खासदार साथ सोडणार?

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या चर्चेत असलेल्या ऑपरेशन टायगर संदर्भात केंद्रीय राज्यमंत्री तथा शिवसेना नेते प्रतापराव जाधव यांनी मोठा दावा केला आहे. ऑपरेशन टायगर अंतिम टप्प्यात पोहोचले असून, एकनाथ शिंदे योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील त्या दिवशी ते पूर्ण होईल, असे जाधव यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गटातील संभाव्य पक्षांतराच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे.**



परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव येथे एका कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना प्रतापराव जाधव यांनी हा दावा केला. ते म्हणाले, या ऑपरेशनबाबत ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनीही अप्रत्यक्षपणे कबुली दिली आहे. त्यामुळे आम्हाला यापुढे अधिक काही बोलण्याची गरज नाही.

या सर्व घडामोडींवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार पलटवार केला आहे. ही महाराष्ट्रातील विकृती आहे. महाराष्ट्राला नासवण्याचे काम सुरू आहे. योग्य वेळी महाराष्ट्रातील जनता याला उत्तर देईल, असे ते म्हणाले. तसेच, ऑपरेशन टायगरची भाषा करणाऱ्यांवर टीका करत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही अप्रत्यक्ष निशाणा साधला.

दरम्यान, या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज (१४ जून) मातोश्री येथे पक्षाच्या सर्व खासदारांची तातडीची बैठक बोलावली आहे. आगामी राजकीय परिस्थिती आणि पक्षाची रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

> अंबादास दानवे यांनी यापूर्वी प्रतिक्रिया देताना, काही लोक संपर्कात आहेत, काही उघडपणे बोलतात. आम्हाला सर्व माहिती आहे. लोकसभा निवडणुकीपासून संपर्कात असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आता ते अधिकृतपणे मान्य करायला हवे, असे विधान केले होते. याच वक्तव्याचा आधार घेत प्रतापराव जाधव यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला.

# पेपरफुटीविरोधात आता काँग्रेस मैदानात!

## देशव्यापी आंदोलनाची घोषणा; राहुल गांधी ४ शहरांमध्ये घेणार विद्यार्थी संमेलने

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**देशातील सतत होणारी पेपरफुटी, परीक्षेतील अनियमितता आणि बेरोजगारीच्या मुद्द्यावर काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारविरोधात निर्णायक युद्ध पुकारले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्ष एक मोठे देशव्यापी आंदोलन सुरू करत आहे.**

देशातील लाखो तरुण आणि विद्यार्थ्यांसोबत होणाऱ्या फसवणुकीविरोधात आवाज उठवणे हा या आंदोलनाचा उद्देश आहे. या सभांमध्ये, परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, युवा संघटना, शिक्षक आणि पेपरफुटी प्रकरणामुळे प्रभावित झालेले तरुण थेट राहुल गांधींशी संवाद साधतील आणि आपल्या समस्या मांडतील. विद्यार्थी आणि तरुणांचा आवाज उठवण्यासाठी राहुल गांधी स्वतः पुढाकार घेत आहेत. ते देशातील प्रमुख शिक्षण आणि कोचिंग केंद्रांमध्ये मोठ्या विद्यार्थी सभांना संबोधित करतील. या महामोहिमेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, या आंदोलनाच्या माध्यमातून (पान २ वर)

# सोन्याचे भाव पुन्हा वाढले तर चांदीही झाली महाग

## मागील घसरणीनंतर भारताच्या सराफा बाजारात सोने-चांदीच्या दरात वाढ

वृत्तसंस्था । मुंबई

**मागील घसरणीनंतर आज भारताच्या सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या दरात वाढ दिसून येत आहे. जागतिक चढ-उतार आणि गुंतवणूकदारांकडून वाढलेल्या मागणीमुळे मौल्यवान धातूंच्या किमतीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे.**



आज, शुद्ध २४-कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,४८,५८० आहे. दरम्यान, दागिन्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या २२-कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,३६,२०० ते १,३७,२३० आहे. त्याचप्रमाणे, १८-कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,११,४५० ते १,१२,४२० आहे. आज चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. आज चांदीचा भाव प्रति ग्रॅम २६०.१० आहे. (पान २ वर)

**शहरानुसार सोन्याचे दर (प्रति १० ग्रॅम)**
- दिल्ली – १,४९,३२०
- मुंबई – १,४९,५८०
- कोलकाता – १,४९,३८०
- चेन्नई – १,५०,०२०
- हैदराबाद – १,४९,८२०
- अहमदाबाद – १,४९,७८०
- पाटणा – १,४८,९१०

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंचा मोठा इशारा

# शेतकऱ्यांनो लक्ष द्या! राज्यात खतांची टंचाई होणार?

वृत्तसंस्था । पुणे

**राज्यात सध्या खतांचा पुरवठा सुरळीत असून, पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धाच्या परिस्थितीमुळे भविष्यात खतटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. मात्र, राज्यातील शेतकऱ्यांना खतांची कमतरता भासू नये म्हणून केंद्रीय कृषिमंत्र्यांशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. असेही त्यांनी सांगितले.**



सन २०१९ मधील कर्जमाफी योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा थोडे अधिक आहे, त्यांना लाभ मिळाला नव्हता, अशा शेतकऱ्यांना आता (पान २ वर)

# ड्रोनद्वारे भारतीय जहाजावर हल्ला

## ट्रम्पने हल्ल्याचे खापर इराणवर फोडले

वृत्तसंस्था । वाशिंग्टन

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ भारतीय जहाजावर हल्ला केल्याच्या केलेल्या दाव्यावर इराणने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. भारतातील इराणी दूतावासाने ट्रम्प यांचे आरोप ङ्गपूर्णपणे निराधारफ असल्याचे म्हटले असून, अमेरिका लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे म्हटले आहे. इराणचा दावा आहे की, एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत अमेरिकेच्या लष्कराने भारतीय खलाशांना घेऊन जाणाऱ्या तीन जहाजांवर हल्ला केला, ज्यात तीन भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला.**



भारतातील इराणी दूतावासाने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील भारतीय जहाजाबाबत ट्रम्प यांचे आरोप पूर्णपणे निराधार आहेत. दूतावासाने म्हटले आहे की, भारतीय खलाशांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अलीकडील अमेरिकन हल्ल्यांवरून लक्ष विचलित करण्याचा हा प्रयत्न आहे. इराणने आरोप केला आहे की, अमेरिकेने एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत तीन भारतीय जहाजांना लक्ष्य केले, ज्यामुळे तीन निष्पाप भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. दूतावासाने अमेरिकेच्या या कृतीवर तीव्र टीका करत, तिला क्रूर आणि लज्जास्पद म्हटले आहे. यापूर्वी, अमेरिकेचे (पान २ वर)

# सक्षमीकरणासाठी महिला शेतकऱ्यांना मिळणार वैधानिक दर्जा

## पावसाळी अधिवेशनात विधेयक सादर होणार : मुख्यमंत्री

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य सरकारने महिला शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी,यासाठी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा. कृषी क्षेत्रातील महिलांना शेतकरी म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, (पान २ वर)



## संपादकीय

### अंमलबजावणीचा दुष्काळ

जूनच्या मध्यापर्यंत मान्सूनची चाहूल न लागल्याने आणि आणखी काही दिवस तरी पावसाची शक्यता नसल्यामुळे राज्यापुढे दुष्काळी स्थितीचे आव्हान उभे आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे धरणे काठोकाठ भरल्यानंतर सहा–सात महिन्यांतच ही वेळ का यावी, हा प्रश्न पडणे साहजिकच. जलसाठ्यांच्या व्यवस्थापनातील अपयश, हे त्याचे सरळसरळ उत्तर. पुणे, मराठवाडा, विदर्भ आणि नाशिक या विभागांतील धरणे जवळजवळ रिकामी झाली आहेत. त्यामुळे नव्या युगातील या मंदिरांच्या पोटातील प्राचीन मंदिरे आणि गावांचे अवशेष पृष्ठभागावर येत आहेत. बहुधा कोरड्या न पडणाऱ्या कोयना धरणातही केवळ नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे वीजनिर्मिती जवळपास थंडावली असून, दमदार पाऊस झाला नाही, तर सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भीती आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारी उपाययोजना सुरू होतीलच; पण त्यापूर्वी गेल्या वर्षभरात धरणांमधील पाण्याचा विनियोग कसा केला, आणि आताच ही वेळ का आली, याची झाडाझडती घेऊन जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक आहे. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना–परभणी आणि खानदेशातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून एक–दोनदाच पाणी येते. खरे तर १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी पुरेल, एवढा जलसाठा राखून ठेवण्याचे नियोजन जलसंपदा विभाग आजवर करत आला आहे. मग, दीड महिना आधीच ही परिस्थिती उद्भवली; म्हणजेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि वितरणात काही तरी चुकते आहे, हे नक्की. मुख्य अडचण जलसाठे राखणारा जलसंपदा विभाग आणि शहरात पाणीवितरण करणारी महापालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावात आहे. पुण्याच्या पाण्यात ४० टक्के गळती असल्याची कबुली पूर्वी महापालिका आयुक्तांनी दिली होती. ती दूर करण्यासाठी काय पावले उचलली, याचे उत्तर मिळालेले नाही. पूर्वी कालव्यातून पाणीपुरवठा करताना पाण्याची गळती–वाफ होते, असे सांगितले जाई. आता महापालिका शंभर टक्के पाणी जलवाहिनीतून घेते, त्यामुळे तोही प्रश्न राहिला नाही. अशा वेळी ग्रामीण विरुद्ध शहरी असा वाद जाणीवपूर्वक पेटवून दिला जातो. खरे तर पाऊस कमी होणार, याचे अंदाज दोन महिन्यांपूर्वीच आले असतानाही उन्हाळ्यात कालव्यातून पाणी का सोडले गेले आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहिता काळात कोणाच्या सूचनांवरून पाणी सोडले, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. पुण्यात दोन–चार टीएमसी पाण्यावरून वाद आहेत. उजनीची कथा वेगळीच आहे. राज्यातील सर्वांत मोठे, शंभर टीएमसी क्षमतेचे हे धरण पूर्ण भरते आणि वर्षात ते रिकामेही केले जाते. त्याची कुठेही हाक ना बोंब! त्याच धरणावर अवलंबून असलेल्या सोलापुरात मात्र अजूनही चार–पाच दिवसांनीच पाणी मिळते. दररोज पाणीपुरवठ्याच्या आश्वासनांना भुलून नागरिकांनी सत्तांतरही केले. पण दोन निवडणुकांनंतरही पाण्याच्या स्थितीत थेंबभराचाही फरक नाही. जून महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक गावे–शहरांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याने टँकर माफियांचेही फावले आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा गेली तीन दशके ऐकू येत आहेत. पण पाऊस कमी होवो की अधिक, अद्याप तरी त्यातून महाराष्ट्राची सुटका झालेली नाही. बेसॉल्ट खडकांनी बनलेल्या महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागांत पाणी साठवणे आणि सिंचनावर मर्यादा आहेत. अशा स्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन हाच मार्ग उरतो. जलयुक्त शिवार सारख्या योजना पूरक म्हणून महत्त्वाच्या आहेत. मात्र दुष्काळ मुक्तीचा तो मुख्य उपाय नव्हे. पर्जन्य जलसंचय करून भूजलाच्या साठ्यात भर घालणे किंवा शहरांतील वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कायदे–नियम सारे तयार आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीचाही भीषण दुष्काळ आहे. पाण्याच्या पुनर्वापराचे प्रमाण दहा टक्केही नाही. शहरांतील वाहिन्यांची दुरुस्ती, धरणांतील गाळ काढणे, गळती–पाणीचोरी रोखणे अशा अनेक उपाययोजना कागदावरच आहेत.

# स्वच्छता, पाणीपुरवठ्यावरुन प्रशासनाला धरले धारेवर

## महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत शिवसेनेचे नगरसेवक धीरज कलंत्री आक्रमक

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत शिवसेनेचे नगरसेवक धीरज कलंत्री यांनी स्वच्छता, पाणीपुरवठा, नालेसफाई आणि सार्वजनिक शौचालयांच्या दुरवस्थेचे उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले. त्यांच्या मुद्देसूद मांडणीमुळे सभागृहाचे लक्ष वेधले गेले. प्रश्न बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समिती सभापती लताबाई सोनार होत्या. अतिरीक्त आयुक्त करुणा डहाळे, नगरसचिव मनोज वाघ तसेच स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.**





नगरसेवक कलंत्री यांनी सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित करत, अनेक ठिकाणी साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी पसरत असून पाणी व नळांच्या सुविधांचाही अभाव असल्याचे सांगितले. चांगले काम करणाऱ्या संस्थांची देयके प्रलंबित ठेवली जातात, मात्र नवा ठेकेदारांचे शौचालयांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. कचरा संकलनाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. अनेक भागांत घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नालेसफाई केवळ नावालाच होत असल्याची टीका करत प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली. प्रभागातील कैलासनगर, अजळकर नगर व देशमुख नगर परिसरात अद्याप पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइन टाकण्यात आलेल्या नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. समस्या मांडण्याबरोबरच स्वच्छता, फवारणी व नालेसफाईसाठी आराखडा तयार नियोजनबद्ध करण्याच्या सूचनाही त्यांनी सभागृहासमोर मांडल्या. दरम्यान, बैठकीत प्रभाग क्र. ८ चे नगरसेवक निलेश नेमाणे यांनी चितोड परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येवरून प्रशासनाला जाब विचारला. वारंवार मागणी करूनही व्हॉल्व दुरुस्तीचे काम होत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरसेवक अमोल मासुळे यांनी निलंबित स्वच्छता कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेवून एक संधी द्यावी, मागणी केली, तर विजय देवरे यांनी नालेसफाईसाठी जेसीबीऐवजी पोकलेनचा वापर करण्याची सूचना केली. बैठकीत पटलावरील सर्व सात विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

### प्रभाग १९ मध्ये पाणीटंचाई

प्रभाग क्र.१९ मध्ये नागरिकांना अनेकदा १० दिवस पाणी मिळत नसल्याने तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरातील इतर भागांना ३ ते ४ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असताना प्रभाग १९ वर अन्याय होत असल्याचा आरोप नगरसेवक आमिर पठाण यांनी केला. केवळ तापी जलवाहिनीवर अवलंबून न राहता अक्कलपाडा योजनेतूनही पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा महापालिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी प्रभागातील वीज उपकेंद्राचा रखडलेला प्रश्नही उपस्थित करण्यात आला.

## शिरपूर येथे एस.टी. महामंडळाची मोहीम



प्रतिनिधी । शिरपूर

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर अवैध प्रवासी वाहतूकीमुळे विपरीत परिणाम होत असून, एस.टी. प्रवाशांना खात्रीशीर व सुरक्षित सेवा पुरवून पुर्ववत आपल्याकडे वळविण्यासह उत्पन्न वाढीसाठी एस.टी. बस स्थानकापासून २०० मिटर पर्यंत नो पार्कंग झोनची प्रभावी अंमजबजावणी करण्यात येत आहे. ही मोहिम १५ जूनपर्यंत राबविण्यात येणार आहे.**

या मोहिमतंर्गत धुळे विभागात सुरक्षा व दक्षता अधिकारी दीपक धात्रक यांच्या नेतृत्वात व आगार व्यवस्थापक सौ. वर्षा पावरा, स्थानिक वाहतूक शाखा पोलिसांच्या मदतीने शिरपूर बसस्थानक परिसरात २०० मिटर नो पार्कंग झोनची अंमजबजावणी करण्यात आली. त्यात वाहनांवर मोटर वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक सुरक्षा निरीक्षक जयवंत कोळी, संजय पवार, सहाय्यक वाहतूक अधिक्षक मनोज पाटील, वाहतूक निरीक्षक सचिन पाटील यावेळी उपस्थित होते.

# घोगळपाडा येथे खेत बचाओ अभियान अंतर्गत मृदा आरोग्य व शाश्वत शेती विषयक जनजागृती

प्रतिनिधी । नंदुरबार

**राष्ट्रव्यापी खेत बचाओ अभियान अंतर्गत आज घोगळपाडा (ता. नवापूर) येथे शेतकऱ्यांमध्ये मृदा आरोग्य संवर्धन, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, मृदा परीक्षणाचे महत्त्व आणि शाश्वत शेती पद्धतींबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान गावाच्या सरपंच सौ. सुमित्रा वळवी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून आत्मा प्रकल्प संचालक दिपक पटेल उपस्थित होते.**



त्यांनी सध्याच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना विविध खतांची उपलब्धता, खतांचा कार्यक्षम व संतुलित वापर तसेच नैसर्गिक शेतीच्या वाढत्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन केले. रासायनिक निविष्ठांवरील खर्च कमी करून स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच शेतकऱ्यांनी मृदा आरोग्य जपत शाश्वत शेती। पद्धतींचा अवलंब करावा, असे त्यांनी सांगितले. पशुसंवर्धन डॉ. खुशालराठोड, शास्त्रज्ञ यांनी शेती व पशुपालन यांचे एकात्मिक व्यवस्थापन, शेणखताचा प्रभावी वापर आणि पशुधनाच्या माध्यमातून शाश्वत शेतीस मिळणारे योगदान तसेच चारपीक लागवड तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. प्रविण चव्हाण यांनी मृदा परीक्षणाचे महत्त्व, मातीतील अन्नद्रव्यांची स्थिती, मृदा आरोग्य पत्रिकेवा वापर तसेच शास्त्रीय अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उत्पादन खर्च कमी करून पीक उत्पादकता वाढविण्याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी आपल्या गावांमध्ये मृदा आरोग्य संवर्धन, मृदा परीक्षण आणि शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये खेत बचाओ अभियान विषयी जागरूकता निर्माण होऊन मृदा आरोग्य व शाश्वत शेतीबाबत सामुदायिक सहभाग अधिक बळकट झाला. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य, बचत गटांच्या प्रतिनिधींसह विविध घटकांनी सहभाग नोंदविला. यावेळी गावाचे उपसरपंच शैलेश पाडवी यांनी आपल्या मनोगतात खेत बचाओ अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरल्याचे सांगितले. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पशुसंवर्धन आणि शाश्वत शेतीविषयक मिळालेली माहिती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतीत उपयोगी पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## पान १ वरुन

पान १ वरुन

**पेपरफुटीविरोधात......**

राहुल गांधी रस्त्यांपासून संसदेपर्यंत तरुणांच्या मागण्या मांडणार आहेत. नीट परीक्षेचे विकेंद्रीकरण, सरकारी परीक्षांमधील अर्ज शुल्काची संपूर्ण समाप्ती, पेपरफुटी करणाऱ्या माफियांवर कठोर कायदेशीर कारवाई आणि या अपयशाबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा तात्काळ राजीनामा, या काँग्रेस पक्षाच्या प्रमुख मागण्या आहेत. काँग्रेसची विद्यार्थी संघटना, एनएसयूआय (छडणख), युवक काँग्रेस आणि सर्व स्थानिक समित्या हे आंदोलन देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी एकत्र काम करतील. यामध्ये विद्यापीठे, शाळा, कोचिंग सेंटर्स आणि युवा केंद्रांमधील विद्यार्थ्यांशी थेट संपर्क साधला जाईल. सोशल मीडिया मोहिमेसोबतच थेट प्रक्षेपण (लाइव्ह स्क्रीनिंग) देखील केले जाईल. काँग्रेस पक्षाचे म्हणणे आहे की, ही लढाई राजकारणाच्या पलीकडची असून देशातील तरुणांचे भविष्य आणि एका न्याय्य शिक्षण व्यवस्थेच्या संरक्षणासाठी आहे. त्यामुळे, पक्ष आगामी संसद अधिवेशनात या विषयावर सखोल चर्चा आणि कठोर कायद्याची मागणी करेल.

**शेतकऱ्यांनो लक्ष द्या!......**

दोन लाखांवरील अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास कर्जमाफीचा लाभ घेता येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना यामुळे मोठा आधार मिळेल, असा विश्वास भरणे यांनी व्यक्त केला. खत वितरण ॲपमधील त्रुटी दूर करणार! – खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि संभाव्य काळाबाजार रोखण्यासाठी फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर जिल्ह्यात याची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नसणे, मोबाईल नेटवर्कची समस्या आदी सर्व तांत्रिक अडचणी लवकरच सोडवल्या जातील, अशी ग्वाही कृषिमंत्र्यांनी दिली.

**सोन्याचे भाव पुन्हा......**

परिणामी, आज एक किलो चांदीचा भाव सुमारे २६०,००० आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी अलीकडेच इराणवरील नियोजित लष्करी हल्ले फेटाळून लावल्याने आणि चर्चेचे संकेत दिल्याने जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता काहीशी कमी झाली आहे. यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास परत आला असून, आंतरराष्ट्रीय बाजारात तसेच इंडियन कमोडिटी एक्सचेंज (चउद) वर सोने आणि चांदीच्या वायद्यांमध्ये लक्षणीय खरेदी झाली आहे. आधारभूत आयात किमतींमध्ये लक्षणीय घट – सरकारने सोन्याची आधारभूत आयात किंमत प्रति १० ग्रॅम ८० डॉलरने कमी करून १३४३ डॉलर केली आहे आणि चांदीची आधारभूत आयात किंमत प्रति किलो २७६ डॉलरने कमी केली आहे. यामुळे आयातदार आणि प्रमुख सराफांसाठी आयातीचे मूल्यांकन अनुकूल झाले आहे, देशांतर्गत बाजारातील भावना मजबूत झाली आहे आणि मागणी वाढली आहे.

**ड्रोनद्वारे भारतीय......**

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला होता की, होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ भारतीय खलाशांना घेऊन जाणाऱ्या जहाजांवरील हल्ल्यांमागे इराणचा हात होता. त्यांनी या घटनेला पूर्णपणे अस्वीकार्य म्हटले होते. तथापि, या दाव्याला कोणताही स्वतंत्र दुजोरा मिळालेला नाही. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचा अमेरिकेवर हल्लाबोल – इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते, इस्माईल बघाई यांनीही अमेरिकेवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, भारतीय व्यापारी जहाजांवरील अमेरिकेचे हल्ले हे अमेरिकेच्या राज्य–पुरस्कृत चाचेगिरी आणि सशस्त्र दरोडा या धोरणाचे उदाहरण आहे. त्यांनी ठार झालेल्या भारतीय नागरिकांच्या कुटुंबीयांप्रति शोकही व्यक्त केला.

**सक्षमीकरणासाठी महिला......**

तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन अशा विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या बाबींचा समावेश करावा. या बैठकीला मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी यावेळी उपस्थित होते.


## आठ हजारावर अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना १५ कोटींची मदत

प्रतिनिधी । धुळे

**मार्च महिन्यात धुळे ग्रामीणमध्ये अतिवृष्टीसह अवकाळी पावसामुळे रब्बी पिके व फळ बागायतीचे अतोनात नुकसान झाले होते. या नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांच्या हाता–तोंडाशी आलेला घास हिरावला गेला होता.या पार्श्वभूमीवर अविरत पाठपुराव्याला यश आले आहे.**

आठ हजारावर अवकाळीग्रस्तांसाठी सुमारे पंधरा कोटींवर मदत मंजूर झाली आहे. लांबलेला पाऊस आणि निराश झालेले शेतकरी आणि पेरणीपुर्वी मंजुर झालेली ही मदत मोठी दिलासा देणारी असल्याचे आ.राम भदाणे यांनी सांगितले. राज्य सरकारने धुळे तालुक्यातील १४ हजार २७५ बाधित शेतकऱ्यांसाठी सुमारे १५ कोटी ५१ लाख रुपयांचा मदतनिधी मंजूर केली आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजारावर शेतकऱ्यांची यादी अंतीम झाली आहे. पुढील टप्प्यात उर्वरीत अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश होणार आहे. आ. भदाणे यांनी सांगितले, त्या कठीण काळात शेतीच्या बांधावर येऊन तुमच्या डोळ्यांतील अश्रू जवळून पाहिले. तुमचा हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून या संकटात तुम्हाला एकटे सोडणार नाही, असा शब्द दिला होता. अविरत पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. अवकाळीग्रस्त गावे अशी बोरकुंड, अंबोडे, आर्णी, बाबरे, बाबुळवाडी, बल्हाणे, बेहेड, भोकर, बिलाडी, बोधगाव, बोरीस, बोरविहीर, चांदे, दापुरा, दापोरी, देऊर, धमाणे, धामणगाव, धामणी, धनूर, धोडी, दोंदवड, गाडऊतार, हडसुणे, हेंद्रण, हॅकळवाडी, विसरणे, जापी, जुनवणे, कापडणे, कावठी, खेडे, खोरदड, कुळथे, कुंडाणे, वार, कुसुंबा आदी ऐंशीपेक्षा अधिक गावांचा समावेश आहे.

## धुळे शासकीय तंत्रनिकेतनमध्ये ड्रोन लॅबचे उद्घाटन



प्रतिनिधी । धुळे

**शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन येथे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत उभारण्यात आलेल्या सुमारे ३ कोटी रुपये खर्चाच्या अत्याधुनिक ड्रोन लॅबचे उद्घाटन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. राजू वाडेकर, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

# मुख्याध्यापकांनी सतर्क राहून नियमानुसार काम करावे

## गुणवत्ता वाढविण्यावर भर द्यावा : जे. के. पाटील; जिल्ह्यातील मुख्याध्यापकांची सहविचार सभा उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव

**जिल्ह्यातील शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसह प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारीची जाणीव ठेवून मुख्याध्यापकांनी काम करावे. भविष्यातील अडचणी व संकटे टाळण्यासाठी आवश्यक तेथे 'नाही' म्हणण्याचे धैर्यही मुख्याध्यापकांनी आत्मसात केले पाहिजे, असे प्रतिपादन राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष जे. के. पाटील यांनी केले.**




माध्यमिक शिक्षण विभाग आणि जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव येथील ला.ना.विद्यालयाच्या सभागृहात आयोजित मुख्याध्यापकांच्या सहविचार सभेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारपीठावर जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, उपशिक्षणाधिकारी रागिणी चव्हाण, चंद्रकांत गवळी, वेतन पथक अधीक्षक दिलीप पवार, महेंद्र पवार, मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष एस.एस. पाटील, ललित चौधरी, साधना लोखंडे, सचिव आर.ए.पाटील आदी उपस्थित होते. जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांनी मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. विविध स्पर्धा परीक्षा, निपुण महाराष्ट्र अभियान तसेच शैक्षणिक गुणवत्तेचे निर्देशांक उंचावण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. प्रशासनातील वाढत्या डिजिटल प्रक्रियेचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, शासनाच्या ई–गव्हर्नन्स प्रणालीमुळे शिक्षण विभागाकडे येणारे सर्व प्रस्ताव आता डिजिटल स्वरूपात सादर करणे आवश्यक ठरणार आहे. येत्या आठ दिवसांत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती देतानाच संचमान्यतेतील मंजूर पदांपेक्षा अधिक पदांचे वेतन वेतन पथकाकडे सादर होऊ नये, अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली. उपशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी यांनी शाळास्तरावरील माहिती अचूकपणे भरून ती केंद्रस्तरापर्यंत पोहोचल्याची खात्री करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तर रागिणी चव्हाण यांनी शालेय दप्तर, विविध नोंदवह्या, रजिस्टर व अभिलेख व्यवस्थित आणि परिपूर्ण ठेवण्यासाठी आवश्यक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक संघाचे माजी उपाध्यक्ष आर. डी. निकम यांनी शाळास्तरावरील विविध समित्यांची रचना, त्यांची कार्यपद्धती आणि जबाबदाऱ्या याविषयी माहिती दिली. वेतन पथक अधीक्षक दिलीप पवार यांनी शिक्षक व कर्मचाऱ्यांचा पगार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेलाच मिळावा यासाठी नियोजन सुरू असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन रागिणी चव्हाण यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
※ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (※ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१८९६ : महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली.

१९०५ : शास्त्रीय संगिताच्या प्रख्यात गायिका हिराबाई बडोदेकर यांचा जन्म.

१९०५ : जुन्या काळातील प्रसिध्द नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांचे निधन.

# जळगाव विधान परिषदेसाठी तिरंगी लढत रंगणार

## रेश्मा काळे यांची माघार; अपक्ष अनिल चौधरींचे महायुतीसमोर आव्हान; भाजपची डोकेदुखी वाढली

प्रतिनिधी । जळगाव





**जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगात आली असून राजकीय समीकरणे कमालीची बदलली आहेत. महायुतीकडून भाजपचे नंदकिशोर महाजन आणि महाविकास आघाडीकडून शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे शरद तायडे यांच्यात मुख्य लढत होईल, असा अंदाज सुरुवातीला व्यक्त केला जात होता. मात्र, प्रहार संघटनेचे नेते तथा भुसावळचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरींनी अपक्ष उमेवारी करीत शड्डू ठोकल्यामुळे या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे.**

राज्यातील १७ विधान परिषद जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून त्यापैकी सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ११ जागांसाठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे. अनिल चौधरींचा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींशी असलेला दांडगा संपर्क आणि वैयक्तिक हितसंबंधांमुळे ते महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्यासमोर तगडे आव्हान उभे करू शकतात, असा राजकीय तज्ज्ञांचा अंदाज आहे. अनिल चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच जिल्ह्यातील विविध नगरपालिका, नगरपंचायती आणि स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींची मोठी जमवाजमव करून आपली ताकद दाखवून दिली होती. भुसावळ आणि संपूर्ण जळगाव जिल्ह्यात चौधरी कुटुंबाचा असलेला वैयक्तिक प्रभाव आणि सर्वपक्षीय नेत्यांशी असलेले सलोख्याचे संबंध यामुळे अनेक नाराज लोकप्रतिनिधी छुपेपणाने चौधरी यांच्या पाठीशी उभे राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना (शिंदे गट) च्या नगरसेविका रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी मागे घेतली असली तरी अनिल चौधरींनी ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत बिनविरोध होऊ देणार नाही, असा पवित्रा घेतला आहे. जळगाव विधान परिषदेचा इतिहास पाहिला तर येथे पक्षाच्या अधिकृत उमेदवारापेक्षा स्थानिक पातळीवरील वैयक्तिक हितसंबंध आणि छुपी गणिते नेहमीच वरचढ ठरली आहेत. सन २०१० च्या निवडणुकीतही तत्कालीन अपक्ष उमेदवार मनीष जैन यांनी निखील खडसे या उमेदवाराला धूळ चारत विजय मिळवला होता. सध्याची परिस्थिती पाहता, अनिल चौधरींनी ज्या पद्धतीने निवडणुकीत मोर्चेबांधणी केली आहे, ती पाहता ते महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांचा खेळ बिघडवू शकतात. महाविकास आघाडीचे शरद तायडे रिंगणात असल्यामुळे ही लढत तिरंगी होणार असून आता कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### रेश्मा काळेंचा महायुतीला पाठिंबा

जळगाव विधान परिषद निवडणुकीतील राजकीय घडामोडींना अखेर पूर्णविराम मिळाला असून शिवसेना शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. शिवसेना शिंदे गटाचे पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे जळगावमधील बंडखोरीचा तिढा अखेर सुटला आहे. रेश्मा काळेंनी माध्यमांशी बोलताना आपण प्रचार थांबवत असून महायुतीच्या उमेदवाराला पूर्ण पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट केले. एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या सर्व जागांवर महायुतीला विजय मिळेल, असा विश्वास मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### विधानपरिषद निवडणुकीनिमित्त जिल्ह्यात कोरडे दिवस जाहीर

**जळगाव ।** महाराष्ट्र विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या १७ जागांसाठी होणाऱ्या द्विवार्षिक व पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जळगाव जिल्ह्यात कोरडे दिवस जाहीर करण्यात आले आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार मतदान दि. १८ जून रोजी होणार असून मतमोजणी दि. २२ जून २०२६ रोजी होणार आहे. यानिमित्त लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ (सी) अन्वये तसेच जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम १४२ (१) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी आदेश जारी केले आहेत. जारी आदेशानुसार संपूर्ण जळगाव जिल्ह्यात दि. १६ जून २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदर मद्यविक्रीस बंदी लागू राहील. दि. १७ जून रोजी संपूर्ण दिवस, दि. १८ जून रोजी मतदानाची प्रक्रिया पूर्ण होऊन सायंकाळी ४ वाजेपर्यंत तसेच दि. २२ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोरडा दिवस लागू राहणार आहे. या कालावधीत जळगाव जिल्ह्यातील सर्व ठोक व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकांनी आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

# भडगाव तालुका क्रीडा संकुलांची , पिंपळगाव हरेश्वर मंदिर परिसराची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



प्रतिनिधी । जळगाव

**पाचोरा उपविभागीय जनसमाधान कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी भडगाव येथील क्रीडा संकुल तसेच जिल्हा क्रीडा विभागांतर्गत येणाऱ्या भडगाव तालुका क्रीडा संकुलास भेट देऊन उभारण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधांची माहिती घेतली. भडगाव येथील बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी कुस्ती प्रशिक्षण सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच बास्केटबॉल मैदान, स्केटिंग रिंक आणि २०० मीटर धावनमार्गाच्या सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला.या कामांना गती देऊन, तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी क्रिडा विभागाला दिल्या.**

यावेळी त्यांनी सराव करणाऱ्या बाल खेळाडूंशी संवाद साधला व त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याचा संदेश दिला. विकासकामांच्या अंमलबजावणीत गती आणून नागरिकांना गुणवत्तापूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा भर राहील, असे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले. तदपुर्वी जिल्हाधिकारी घुगे यांनी पिंपळगाव हरेश्वर येथील श्रीहरी हरेश्वर मंदिर परिसरास भेट देऊन माहिती घेतली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी श्रीहरी हरेश्वर मंदिरात दर्शन घेऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. मंदिर व्यवस्थापनाशी चर्चा करताना मंदिराच्या जागेसंदर्भातील मागणी शासन स्तरावर मांडून आवश्यक प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. मंदिर परिसराचा तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत व्यापक विकास करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या संवादादरम्यान जिल्हाधिकारी म्हणाले की, गावाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने प्रशासनाकडून जे शक्य असेल ते करण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न केले जातील. यावेळी पाचोरा उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, तहसिलदार विजय बनसोडे, भडगावच्या तहसिलदार शितल सोलाट, मंदिर देवस्थान ट्रस्टचे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

### बाल संस्कार वर्गातील मुलांना खाऊ वितरण



**जळगाव ।** शहरातील भोईटे नगरातील सोमनाथ मंदिरात आज सकाळी बाल संस्कार वर्गातील चिमुकल्याना, सुसंस्कार आणि चांगल्या सवयी, कुटुंबातील मोठया व्यक्तीची सेवा, नामजप, स्वभाव दोष निर्मूलन या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुलांना चिवडा वाटप करण्यात आला. यावेळी हिंदू जनजागृती समितीच्या सुवर्णा साळुंखे, नीता सोनार, संगीता पाटील आणि नंदा नागणे उपस्थित होत्या.

# घरकाम करणाऱ्या महिलेनेच मारला लाखोंच्या दागिन्यांवर डल्ला

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील गणेश घाट परिसरातील लेकसाईट रेसिडेन्सीमध्ये घरकामासाठी येणाऱ्या महिलेनेच दोन घरांतील सोन्याचे दागिने चोरल्याचे उघडकीस आले आहे. एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावत आरोपी महिलेला अटक केली आहे.**

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, लेकसाईट रेसिडेन्सी गणेश घाट येथे राहणारे सुधा पुरुषोत्तम काबरा (वय ५९) यांच्या घरातील बेडरूममधील कपाटातून सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. तसेच पीयूष दीपक संघवी यांच्या घरातूनही सोन्याचे दागिने गायब झाल्याचे समोर आले. या दोन्ही घरांमध्ये कामासाठी येणारी मोतीबाई राजपाल धांडेकर (वय ३९) हिनेच ही चोरी केल्याचा संशय पोलिसांना आला. तपासादरम्यान आरोपी महिलेने दोन्ही घरांतील सोन्याचे दागिने चोरल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये दोन तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र किंमत सुमारे १ लाख रु., तीन तोळ्यांचे लांब मंगळसूत्र किंमत सुमारे १.५० लाख रु., १५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा शॉर्ट नेकलेस किंमत ७५ हजार रु., ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स किंमत ४० हजार रुपये असा एकूण ३ लाख ६५ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज चोरीस गेल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. आरोपी महिला घरकामाच्या निमित्ताने घरात वावरत असल्याने तिने संधी साधून कपाटातील दागिन्यांवर डल्ला मारल्याचा आरोप आहे. चोरी झाल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी विजयसिंग पाटील करीत आहेत.

# भडगावच्या जुन्या गिरणा पुलावरील दिवे बंद; पडलेला खांब धोकादायक

प्रतिनिधी । भडगाव

**शहरातील गिरणा नदीवरील जुन्या पुलावर बसविण्यात आलेल्या विद्युत दिव्यांपैकी अनेक दिवे बंद पडले असून, एका दिव्याचा खांब अनेक दिवसांपासून खाली पडलेल्या अवस्थेत आहे. पुलावरील विद्युत दिव्यांच्या देखभालीची जबाबदारी नगरपरिषदेकडे असताना ही परिस्थिती कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.**



रात्रीच्या वेळी पुलावर पुरेसा प्रकाश नसल्याने पादचारी, दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांना अंधारात प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे, याच पुलाचा वापर शाळकरी विद्यार्थीही दररोज ये-जा करण्यासाठी करतात. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. सध्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर खाली पडलेल्या विद्युत खांबामध्ये पावसाचे पाणी साचणे किंवा इतर तांत्रिक बिघाडामुळे विद्युत प्रवाह उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी खबरदारी म्हणून प्रशासनाने तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. स्थानिकांनी नगरपरिषदेकडे बंद पडलेले दिवे त्वरित सुरू करणे, पडलेला खांब सुरक्षितरीत्या उचलून आवश्यक दुरुस्ती करणे आणि पुलावरील प्रकाशव्यवस्था नियमितपणे तपासण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही दुर्घटना होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव



**जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटी येथे अनुसूचित जाती विभागाची आढावा बैठक अनुसूचित जाती विभागाचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिरुद्ध वनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.**

याप्रसंगी अनिरुद्ध वनकर यांनी अनुसूचित जाती विभागाने जोमाने कामाला लागा व थेट जनतेपर्यंत पोहोचा,असा संदेश देत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे नेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली घराघरापर्यंत काँग्रेस पोहोचली पाहिजे. जनतेची कामे ही अध्यक्षांनी केली पाहिजे, अशा सूचना त्यांनी दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. कैलास शेळके यांनी केले. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव प्रवीण सुरवाडे, जळगाव शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी शहराध्यक्ष श्यामकांत तायडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष योगेश पाटील, जळगाव ग्रामीण जिल्हाध्यक्ष ॲड. अविनाश भालेराव यांची भाषणे झाली. यावेळी भुसावळचे सुधीर जंजाळे, बाबा देशमुख, दीपक सोनवणे, प्रदीप सोनवणे, जगदीश गाडे, राहुल भालेराव, जाकीर बागवान, राहुल मोरे, छाया कोरडे, अर्चना गाढे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# लोण प्र.ऊ.येथे भीषण पाणीटंचाई; ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात चकरा

प्रतिनिधी । भडगाव

**लोण प्र. ऊ. गावात गेल्या काही दिवसांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. गावातील अनेक भागांमध्ये नळपाणी पुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना पाण्याची कोणत्याही सोय नाही. हातपंप गावात नाहीत. तसेच पूर्वी ३ विहिरी असताना मागील सरपंचांनी नष्ट करून वहिवाटीसाठी रस्ता केला. त्यामुळे आता पाण्याचं प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



गावातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी सरपंचांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यालयात वारंवार पाठपुरावा केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देऊन गावातील परिस्थितीची माहिती देण्यात आली. मात्र अद्यापपर्यंत ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने गावातील जलस्रोतही कमी पडत असून अनेक महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना दररोज पाण्यासाठी लांब अंतर पार करावे लागत आहे. सरपंच ॲड.बी.आर.पाटील यांनी गावासाठी नागरिकांना खासगी टँकरचे पाणी पुरवणे सुरू केले आहे. तसेच टँकरने अजित मुसंडे यांच्या शेतातून पाणी आणून ग्रामपंचायतीच्या विहिरीत पाणी सोडून गावाला पाणी दिले जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून जलजीवन योजना अंतर्गत मंजूर झालेले काम आजतगत पूर्ण होत नाही याबाबत अनेकदा ठेकेदारांना भेटून देखील मार्ग निघत नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी सरपंच व ग्रामस्थांनी केली आहे.सरपंचांनी पाणीपुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. दरम्यान,प्रशासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

# पशुसंवर्धन विभागाच्या तत्परतेने टळली मोठी जीवितहानी

## १९६२ हेल्पलाइन ठरली ३५ पशुधनासाठी नवसंजीवनी!

प्रतिनिधी । जळगाव

**बाजारात विक्रीस आलेल्या अप्रमाणित खाद्याचा पुरवठा केल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील गालापूर येथील एका पशुपालकाच्या ३५ गाई-म्हशींना अचानक फूड पॉयझनिंग (अन्नबाधा) झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे. मात्र, शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ या आपत्कालीन हेल्पलाइनच्या तत्परतेमुळे या सर्व पशुधनाचे प्राण वाचवण्यात यश आले असून एक मोठी संभाव्य जीवितहानी टळली आहे.**



गालापूर येथील पशुपालक हमीर गबाजी गवळी यांच्या ३५ गाई-म्हशींना अनोंदणीकृत खाद्यामुळे विषबाधा झाली होती. अशा कठीण परिस्थितीत श्री.गवळी यांनी भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या १९६२ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधला. पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथील राज्यस्तरीय कॉल सेंटरच्या टीमने माहिती मिळताच तात्काळ क्षेत्रीय स्तरावरील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधला. डॉ. यशवंत धावसे यांनी पशुधन पर्यवेक्षक सुदर्शन पाटील व वाहनचालक भूषण कोळी यांना घटनास्थळी पाठवून तत्पर सेवा दिली.

> १९६२ कॉल सेंटरवरुन संदेश मिळताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेत घटनास्थळी उपचारार्थ भेट दिली. पशुधनाने अप्रमाणित पशुखाद्य खाल्ल्यामुळे विषबाधा झाल्याचे समोर आले. त्यानुसार बाधित पशुधनावर सोडियम बायकार्बोनेट, चारकोल, अट्रॉपीन सल्फेट, आर.एल., सी.पी.एम. व बी-कॉम्प्लेक्स औषधींद्वारे उपचार करण्यात आला. सलग चार दिवस उपचार केल्यानंतर बाधित पशुधन आता सुरक्षित आहे.
>
> **डॉ. यशवंत धावसे,**
> **फिरते पशुवैद्यकीय पथक, एरंडोल**

> १९६२ ही पशुवैद्यकीय आपत्कालीन सेवा राज्यातील पशुपालकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पशुधनाच्या आरोग्याचे संरक्षण व पशुपालकांना वेळेवर उपचार सेवा उपलब्ध करून देणे ही विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. राज्यातील सर्व पशुपालकांनी पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास १९६२ या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा. पशुसंवर्धन विभाग त्यांच्यापर्यंत जलद, गुणवत्तापूर्ण व प्रभावी पशुवैद्यकीय सेवा पोहोचविण्यास कटिबद्ध आहे.
>
> **डॉ. किरण पाटील**
> **आयुक्त पशुसंवर्धन, पुणे**

# जिल्ह्यात १३ गावांमध्ये २० खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा

प्रतिनिधी । जळगाव




**उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या विविध उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. जलस्रोतांचे नियोजन, पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती, विहिरींचे अधिग्रहण तसेच आवश्यक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात सध्या १३ गावांमध्ये २० खासगी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.**

यामध्ये जामनेर तालुक्यातील ३ गावे, भुसावळ तालुक्यातील १ गाव, अमळनेर तालुक्यातील ८ गावे आणि पारोळा तालुक्यातील १ गाव यांचा समावेश आहे. या गावांतील सुमारे १ लाख १९ हजार ६०६ नागरिकांना या उपाययोजनांचा लाभ होत आहे. पाणीटंचाई निवारणासाठी जिल्ह्यात ५६ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या असून, त्यापैकी सर्वाधिक १४ विहिरी मुक्ताईनगर व १४ अमळनेर, ११ जामनेर तालुक्यात विहिर अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील १० ठिकाणी टँकरसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील जळगाव, धरणगाव, एरंडोल, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, पाचोरा, चाळिसगाव, भडगाव आणि चोपडा या तालुक्यांमध्ये सध्या कोणत्याही गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता भासलेली नाही. प्रशासनाकडून पाणीटंचाईग्रस्त भागांवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून, पुरेसा व सुरक्षित पाणीपुरवठा उपलब्ध करून आवश्यक त्या उपाययोजना तत्परतेने राबविल्या जात असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात

### पलोड पब्लिक स्कूलच्या पूर्वप्राथमिक विभागाचा शुभारंभ

**जळगाव ।** विवेकानंद प्रतिष्ठान संचलित काशिनाथ पलोड पब्लिक स्कूलच्या पूर्वप्राथमिक विभागातील नर्सरी, ज्युनिअर केजी आणि सीनिअर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ सोमवार, दि. ८ जून रोजी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकले विद्यार्थी आनंदाने आणि उत्सुकतेने शाळेत दाखल झाले. विद्यार्थ्यांचे स्वागत ढोल-ताशांच्या गजरात व औक्षण करून करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य प्रवीण सोनावणे, समन्वयिका सौ. कंचन सरोदे तसेच पूर्वप्राथमिक विभागातील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.

### राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सानवी गडेचे उल्लेखनीय यश

**यावल ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ आयोजित २०२५-२६ च्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत बाल संस्कार विद्या मंदिर विद्यालयाची इयत्ता ७ वीची विद्यार्थिनी सानवी पंकज गडे हिने तृतीय क्रमांक प्राप्त करून शाळेसह यावल शहराचा तसेच जळगाव जिल्ह्याचा मान उंचावला आहे. सानवी हिने आपल्या उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि परिश्रमांच्या बळावर राज्यस्तरावर हे यश संपादन केले आहे. ती प्रा. पंकज गडे यांची मुलगी आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे बाल संस्कार विद्या मंदिर विद्यालय तसेच तिचे पालक, शिक्षकवृंद आणि सर्व यावलकरांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे. या उज्ज्वल यशाबद्दल सानवी गडे हिचे संस्थेचे अध्यक्ष महेश वाणी, मुख्याध्यापक सुनिल माळी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नातेवाईक तसेच शहरातील विविध स्तरातून सानवीचे कौतूक होत आहे.

# घाडवेल ग्रामपंचायत निवडणूक आरक्षण सोडत घोषित

**● प्रभाग क्रमांक १ मध्ये सर्वसाधारण महिला तर १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव**

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील घाडवेल ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत नुकतीच पार पडली. या सोडतीत ग्रामपंचायतीच्या एकूण ७ सदस्य पदांसाठी विविध प्रवर्गानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले. आरक्षणानुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये २ जागा असून त्यापैकी १ जागा सर्वसाधारण (महिला) तर १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.**



प्रभाग क्रमांक २ मध्ये ३ जागा असून त्यामध्ये १ जागा अनुसूचित जमाती (महिला), १ जागा अनुसूचित जमाती आणि १ जागा नामनिर्देशित (महिला) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये २ जागा असून त्यापैकी १ जागा सर्वसाधारण (महिला) तर १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे. एकूण आरक्षणाचा विचार करता अनुसूचित जाती - ०, अनुसूचित जमाती - २, नामनिर्देशित (महिला) - १ आणि सर्वसाधारण - ४ अशा ७ जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

ही आरक्षण सोडत प्रभारी अधिकारी नरेंद्र जाधव, ग्रामसेवक एम. एम. पाटील, तलाठी एस. पी. सूर्यवंशी, पोलीस पाटील भागवत दगडू पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी ज्ञानेश्वर पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी अशोक छन्नु कोळी, देवेंद्र खेमराज पाटील, गौतम शिरसाट (शिपाई), समाधान पाटील, राहुल कोळी, विजय मोहन पाटील, मंगल ज्ञानेश्वर पाटील, अशोक गोपीचंद पाटील, विकास उत्तम कोळी, रविंद्र गोरख पावरा, लिलाधर निंबा पाटील, दीपक इंगळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महात्मा फुले जन्मद्विशताब्दी निमित्त प्रा.प्रल्हाद लुलेकर यांचे आज व्याख्यान

**प्रतिनिधी । जळगाव**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे दि. १४ जून रोजी सायंकाळी पाच वाजता अभियंता भवन,महाबळ रोड जळगाव येथे महात्मा जोतिराव फुले जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त प्रसिद्ध साहित्यिक तथा विचारवंत प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी डॉ.अब्दुल करीम सालार राहणार आहेत. यावेळी ॲड. राजेश झाल्टे, मुकुंद सपकाळे, जयसिंग वाघ, डॉ. मिलिंद बागुल, प्रा.डॉ.सत्यजित साळवे, प्रा.प्रीतीलाल पवार मान्यवर अतिथी उपस्थित राहणार आहेत उपस्थितीचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लासुर येथे पुरुषोत्तम मासात जावयाकडून साल्यांना गोदान

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील लासुर येथे वाणाऐवजी गोदान देऊन डॉ. देसले परिवाराचा संस्कार, गोरक्षण आणि सेवाभावाचा अनोखा संदेश दिला आहे.**



पुरुषोत्तम मास अर्थात अधिक मास हा हिंदू धर्मात दान, धर्म, जप, सेवा आणि पुण्यसंचयासाठी विशेष मानला जातो. या पवित्र महिन्यात विविध प्रकारचे दान करण्याची परंपरा आहे. याच भावनेतून आपल्या गावातील जावईबापू डॉ.अरुण देसले व डॉ.अमित देसले यांनी एक आगळावेगळा आणि समाजाला प्रेरणा देणारा उपक्रम राबवत गोदान करून गावात वेगळी परंपरा निर्माण केली आहे. परंपरेनुसार अधिक मासात जावयाला वाण लावण्याची प्रथा अनेक ठिकाणी आढळते. मात्र, डॉ. देसले परिवाराने या रूढ चौकटीच्या पुढे जात, नात्याने शालक असलेल्या कुटुंबीयांप्रती स्नेह व्यक्त करत दोन गाई व त्यांच्या वासरांसह पवित्र गोदान केले. हे दान वारकरी परंपरेतील हरिभक्त परायण हभप प्रभाकर महादू महाजन, हभप आत्माराम पाटील यांना करण्यात आले. हिंदू संस्कृतीत गोदान अत्यंत पवित्र आणि पुण्यकारक दान मानले जाते. गाय ही केवळ श्रद्धेचे प्रतीक नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती आणि दुग्धव्यवसायाचा महत्त्वाचा आधार आहे. गाईंचे पालन-पोषण, त्यांचे संरक्षण आणि त्यांच्या माध्यमातून स्वावलंबन वाढविण्याचा विचार या दानामागे अधोरेखित होताना दिसतो. दान करताना गाईंची योग्य देखभाल केली जाईल, त्यांचे संगोपन केले जाईल आणि त्यांना कसायाकडे विकले जाणार नाही. या भावनेतून हे दान केवळ धार्मिक विधी न राहता गोरक्षण व गोपालनाचा सामाजिक संकल्प ठरला आहे.

## चोपडा येथे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार



**प्रतिनिधी । चोपडा**

**येथे राज्य परिवहन महामंडळातून सेवानिवृत्ती झालेले सुदाम रामदास करणकाळ तसेच बापू त्रिंबक बहारे ग्रेडेड मुख्याध्यापक वेले यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने छोटू वारडे व मित्र परिवार यांनी शासकीय विश्रामगृह चोपडा येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. दिलीप पंडित सपकाळे यांनी स्वीकारले.**

यावेळी सत्कारमूर्ती सुदाम रामदास करणकाळ तसेच ग्रेडेड मुख्याध्यापक बापू बहारे यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी नगरसेवक रमेश शिंदे, नगरसेविका वंदनाबाई सुधाकर बाविस्कर, माजी नगरसेवक अशोक राजाराम बाविस्कर, भरत भीमराव शिरसाठ (अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा चोपडा), विजय कढरे, मोहन फुगारे (माजी कस्टम अधिकारी), सुभाष वारडे, संतोष बाविस्कर, प्रा. पानपाटील पूर्णानंद वारडे, हिलाल वारडे, रवींद्र वाडे, छोटू सोनवणे, भीमराव उमाळे, निर्मल अहिरे, कुलभूषण डोळे, अनिल वाडे यांनी सेवानिवृत्ती कर्मचारी यांचे शाल गुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी सुदाम करणकाळ व बापू बहारे यांच्याविषयी मान्यवरांनी त्यांच्या कार्यकाळाबाबत मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुखदेव लक्ष्मण बाविस्कर (आडगाव) यांनी केले. तसेच शेवटी कार्यक्रमाचे आभार पूर्णानंद वारडे यांनी मानले.

## गांधीपुरा मेहतर कॉलनीतील घराला आग; संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**प्रतिनिधी । अमळनेर**

**शहरातील गांधीपुरा मेहतर कॉलनी परिसरात शनिवार, दि.१३ जून रोजी दुपारी २.२७ वाजेच्या सुमारास पप्पू वसंत कलोसे यांच्या घराला अचानक आग लागल्याची घटना घडली. आग लागल्याची माहिती मिळताच नगरपालिकेचे अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे विझविण्यात यश मिळविले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.**




या आगीत घरातील एसी, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, कपाट, कॉट तसेच अन्य संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. आगीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती. अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे आग शेजारील घरांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या बचावकार्यात अग्निशमन दलाचे कर्मचारी फारूक शेख, दिनेश बिऱ्हाडे, रफीक पठाण, आकाश बाविस्कर व लखन कंखरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आग आटोक्यात आणली. आग लागण्याचे नेमके कारण समजू शकले नाही.

### मोकाट कुत्र्यांचा सहा वर्षीय चिमुकलीवर हल्ला

**प्रतिनिधी । भुसावळ**

शहरातील पांडुरंग नाथ नगर येथील मातोश्री चौक परिसरात मोकाट कुत्र्यांचा धोका पुन्हा एकदा समोर आला आहे. या भागात आरोही माधव शर्मा (वय ६) या बालिकेच्या कानावर रविवारी सायंकाळी अज्ञात मोकाट कुत्र्यांनी जबर चावा घेतल्याने ती गंभीर जखमी झाली. प्राथमिक उपचारानंतर तिला पुढील उपचारांसाठी मुंबई येथे दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

## विश्वशांतीसाठी चोपडा येथे गो-पुष्टी यज्ञ उत्साहात

**प्रतिनिधी । चोपडा**

**चोपडा येथील श्रीराम नगर येथे गो भागवत कथेच्या सातव्या दिवशी सकाळी पाच वाजता विश्वशांतीसाठी व गोमातेच्या संरक्षण व संवर्धनासाठी गो-पुष्टी यज्ञ संपन्न झाला.**



के.डी.चौधरी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अमृत महोत्सव समिती व संत जगनाडे जगदीश गोपाल गोशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील गोभक्तांच्यावतीने यज्ञ संपन्न झाला. यज्ञाचे यजमान म्हणून के. डी.चौधरी यांनी गोभक्तांच्या माध्यमातून आहुत्या दिल्या. गोप्रेमी संत दिनेश महाराज यांच्या अमृतवाणीद्वारे मंत्रोचारात आहुत्या देण्यात आल्या. आहुत्या देणाऱ्यांमध्ये अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष टी. एम चौधरी व गो-शाळेचे अध्यक्ष देवकांत चौधरी, विश्वस्त सूर्यकांत चौधरी व गोभक्त मोरे आप्पा, राजेंद्र चौधरी, लखनभाई तेली तसेच अनेक गोभक्तांनी व गोसेवक मातांनी आहुत्या देऊन विश्वशांतीची व गोमातेच्या संरक्षण व संवर्धनाचे यज्ञ देवतेची आराधना केली.

## जय योगेश्वर ज्युनिअर कॉलेजचे प्रा. अनिल पाटील यांचा अपघाती मृत्यू

**प्रतिनिधी । अमळनेर**

**शहरातील जय योगेश्वर ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक तथा तळवाडे येथील रहिवासी अनिल दयाराम पाटील (वय ५६) यांचा दुचाकी अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. १३ जून) दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास ढेकू रोडवरील पोलीस स्टेशनसमोर घडली. या घटनेमुळे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, प्रा. अनिल पाटील हे एमएच-१९ बीएक्स-९५१३ क्रमांकाच्या मोटारसायकलने आपल्या मूळ गावी तळवाडे येथे गेले होते. तेथून अमळनेरकडे परतत असताना त्यांचा अपघात झाला. रस्त्याच्या कडेला ते गंभीर अवस्थेत पडलेले आढळून आले.

प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात घडला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांचे पार्थिव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे.

प्रा.अनिल पाटील यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, मुलगा, सून तसेच दोन भाऊ असा परिवार आहे. विशेष म्हणजे, अवघ्या महिनाभरापूर्वीच त्यांच्या धाकट्या भावाचे दुःखद निधन झाले होते. त्या दुःखातून कुटुंब सावरत असतानाच प्रा. पाटील यांच्या अपघाती मृत्यूने कुटुंबावर पुन्हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्यांच्या अपघाती मृत्यूमुळे जय योगेश्वर ज्युनिअर कॉलेजसह संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

धनदाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब डी. डी. पाटील तसेच उपाध्यक्ष रावसाहेब के. डी. पाटील यांनी प्रा.पाटील यांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. तसेच अनेक शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनीही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

# कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी करा

**अमळनेर तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षातर्फे तहसीलदारांना निवेदन**

**प्रतिनिधी । अमळनेर**

**राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाने निवेदनाद्वारे केली आहे.**




निवेदनात नमूद केले आहे की, सन २०१९ ते २०२६ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीककर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली असली, तरी योजनेतील अटींमुळे लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. विशेषतः २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी देण्याची अट अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच २ लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतरच कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही अट अव्यवहार्य ठरत असल्याचे म्हटले आहे. प्रोत्साहनपर अनुदान मिळविण्यासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अटही रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, २०१७ च्या कर्जमाफी योजनेत पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ द्यावा, पीकविमा योजनेतील जाचक अटी रद्द करून एक रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी. तसेच पेरणीपूर्वी कर्जखात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर तालुकाध्यक्ष डी.एम.पाटील, शहराध्यक्ष प्रशांत मनोहर निकम, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अशोक पवार, जिल्हा उपाध्यक्ष दिव्यांग सेल शांताराम कोळी, वासुदेव भालेराव पाटील (उपाध्यक्ष), मनोहर दत्तात्रय पाटील (किसान सेल), चिंधू ओकार वानखेडे (सरचिटणीस), जगन्नाथ राजमल पाटील सामाजिक कार्यकर्ते, दीपक जगन्नाथ पाटील (युवक ता. उपाध्यक्ष), संजय पाटील (गांधली), पंजाबराव आसाराम पाटील (अंचलवाडी) आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**गेल्या तीन वर्षांतील सततची नापिकी, नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाच्या घसरलेल्या दरांमुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला असल्याने कोणत्याही अटी-शर्तींशिवाय सरसकट कर्जमाफीची अंमलबजावणी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.**